**कारणे दाखवा नोटिस**

कृआआ-२०१८/प्र.म.कृ.सि.यो./कंनोंनुक/प्र.क्र.०१/1124/फलो-४
कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,
पुणे - ४११ ००५, दि. ~~ऑक्टोबर,२०१८~~ 15 नोव्हेंबर 2018
ई मेल आय डी shreeindustries2888@.gmail.com

**विषय** : विक्री पश्चात सेवा केंद्रांवरील कंपनी नियुक्त अधिकारी/ कर्मचाऱ्याची माहिती चुकीची सादर केल्याबाबत...

कृषि आयुक्तालयाचे आदेश क्र. कृआआ-२०१८/सुसियो/उनोंनु/आदेश/तुषार/प्र.क्र.०७/३१७ फलो-४, दि.३० जानेवारी २०१८ सोबतच्या परिशिष्ट- १ मध्ये समाविष्ट केलेल्या ०६ तुषार सिंचन संच उत्पादक कंपन्यांच्या नोंदणीस, सन २०१७-१८ ते २०२१-२२ या पाच वर्षांसाठी मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. परिशिष्ट-१ मधील अनु क्र.०३ वर **मे.श्री.इंडस्ट्रिज,प्लॉट नं.अे-१२,एम.आय.डी.सी.ग्रोथ सेंटर,मूर्तिजापूर,अकोला-४४४ १०७** यांना स्तंभ क्र.७ मध्ये नमुद केल्यानुसार राज्यातील एकूण ०७ जिल्हयांसाठी मान्यता देण्यात आलेली आहे.

आपण सादर केलेल्या सन २०१८-१९ च्या नूतनीकरण प्रस्तावासोबत सहपत्रित केलेला कंपनी नियुक्त अधिकारी/कर्मचाऱ्यांचा तपशील पडताळणीसाठी खालीलप्रमाणे नमूद दूरध्वनी/भ्रमणध्वनी क्रमांकांवर संपर्क साधला असता प्राप्त झालेली माहिती व प्रत्यक्ष वस्तुस्थिती यामध्ये पुढील प्रमाणे तफावत निदर्शनास आली आहे.

| अ. क्र. | **अधिकारी/ कर्मचायाचे नाव** | **वेळ** | **संबंधितांकडून दूरध्वनी द्वारे प्राप्त तपशील (प्रत्यक्ष वस्तुस्थिती)** | **संबंधित कर्मचायाचा कंपनीने सादर केलेला तपशील** |
|---|---|---|---|---|
| १ | अमोल ठाकरे<br>९७६४६१४४४७ | ११.०५ | बी.एस.सी.ॲग्रि<br>**कोठारी मध्ये काम करतात.** | बी.एस.सी. (३३/प)<br>अमरावती |
| २ | राहूल जयस्वाल<br>९८२२४७१४४० | ११.०० | **स्वतःचा हार्डवेअरचा व्यवसाय आहे. श्री.इंडस्ट्रिज साठी काम करीत नाही.** | एम.एस.सी. (३३/प)<br>परभणी |
| ३ | गजानन घुले<br>९९२२२८०६०२ | ११.०२ | **डिलर आहे.**<br>**शिक्षण ८ वी पर्यंत** | बी.एस.सी.ॲग्रि. (३३/प)<br>वाशिम |

उपरोक्त नुसार सन २०१८-१९ मध्ये नूतनीकरणासाठी आपण कृषि आयुक्तालयास सादर केलेली माहिती चुकीची अथवा खोटी आढळून आल्यामुळे आपले कंपनीस दिलेले नोंदणीआदेश रद्द करणेबाबत शासनास का प्रस्तावित करण्यात येऊ नये या बाबतचा खुलासा सदरची नोटिस मिळालेपासून १० दिवसांच्या आत सादर करावा. अन्यथा खुलासा सादर न केलेस नियमा नुसार पुढील कार्यवाही करणेत येईल. याची नोंद घ्यावी.

**संचालक फलोत्पादन**
कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,पुणे-५

प्रति,

**मे.श्री.इंडस्ट्रिज,प्लॉट नं.अे-१२,एम.आय.डी.सी.**
**ग्रोथ सेटर,मूर्तिजापूर,जि.अकोला.पिन-४४४ १०७**